# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे
## (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

जा.क्र.मुंमप्र.झोपुप्रा/स.प्रा.ठा.४/वारसआदेश/मित्रधाम/२०२५/९०७
दिनांक :- १६/०७/२०२५

वाचले :- १) प्राधिकरणाकडील परिपत्रक क्रमांक १४, मुंमप्र झोपुप्रा/परिपत्रक/१६/२०२१, दि.२८/०५/२०२१

२) सक्षम प्राधिकारी तथा उपआयुक्त समाज विकास विभाग, ठाणे महानगरपालिका,ठाणे यांचेकडील झोपडीधारकांचे पात्र/अपात्र बाबतचे परिशिष्ट-२, दि.१२/११/२०१२

३) श्री.प्रज्ञा प्रदिप मोरे यांनी प्राधिकरणात सादर केलेला दि.२७/०९/२०२४ रोजीचा अर्ज.

---

# आदेश

मौजे- चेंदणी, सि.स.क्र.१०२५ (पै.) धोबीघाट ठाणे (पू) या मिळकतीवरील मित्रधाम सह.गृह.संस्थेचे अंतिम परिशिष्ट-२ हे उप आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, समाज विकास विभाग,ठाणे महानगरपालिका,ठाणे यांनी दि.१२/११/२०१२ रोजी निर्गमित केले असुन,सदर परिशिष्ट-२ मध्ये झो.क्र.२२ वर श्रीम. कमला काशिनाथ मोतीकर यांना निवासी कारणास्तव पात्र करण्यात आल्याचे दिसुन येते.

मुळ झोपडीधारक श्रीम.कमला काशिनाथ मोतीकर ह्या दि.०९/०३/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांची बहीण श्रीम. प्रज्ञा प्रदिप मोरे पुर्वाश्रमिची श्रीम.वंदना काशिनाथ मोतीकर यांनी श्रीम. कमला काशिनाथ मोतीकर यांचे नावाऐवजी परिशिष्ट-२ मध्ये वारस नोंद लावण्याबाबत दि.२७/०९/२०२४ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे. त्या अनुषंगाने दि.१५/०४/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली, सुनावणीचे वेळी श्रीम. प्रज्ञा प्रदिप मोरे पुर्वाश्रमिची वंदना काशिनाथ मोतीकर हजर होते. अर्जदार यांनी पुढीलप्रमाणे पुरावे सादर केलेले आहेत.

१) नौपाडा कोपरी प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका,ठाणे यांचेकडील श्रीम. कमला काशिनाथ मोतीकर यांचा मृत्यु दि.०९/०३/२०२१ रोजी झालेबाबत नोंदणी क्र.D-२०२१:२७-९०४१४-०००६४८ दि.१७/०३/२०२१, दि.०५/०४/२०२१ रोजी नोंदणी केलेले मृत्यु प्रमाणपत्र.

२) नवी मुंबई महानगरपालिकेकडील श्रीम.वनिता धर्मेंद्र मेहता यांचा मृत्यु दि.०५/११/२०१३ रोजी झालेबाबत नोंदणी क्र.DR/२०१३/C/२२०१ दि.१३/११/२०१३, दि.०२/१२/२०१३ रोजी नोंदणी केलेले मृत्यु प्रमाणपत्र.

३) शिधापत्रिका क्र.SD No.८१९८३४ श्रीम. कमला काशिनाथ मोतीकर यांचे नावे

४) सहा.दुय्यम निबंधक ठाणे क्र.१ यांचेकडील रजिस्टर्ड मृत्युपत्र/इच्छापत्र दस्त क्र.१०१६/२०२१,दि.२२/०१/२०२१

५) श्रीम.प्रज्ञा प्रदिप मोरे यांचे रू.५००/- स्टॅम्प पेपरवर रजिस्टर्ड सहा.दुय्यम निबंधक ठाणे क्र.१ यांचेकडील दि.२२/०१/२०२१ रोजीचे छायांकित कुलमुखत्यारपत्र

६) श्रीम.प्राज्ञा प्रदिप मोरे यांचे रू.१००/- स्टॅम्प पेपरवर दि.०९/०९/२०२४ रोजी केलेले नोटराईज्ड सत्यप्रतिज्ञापत्र.

७) आधारकार्ड क्र.५०६५५२६२९३३६ कमला काशिनाथ मोतीकर यांचे नावे.

८) आधारकार्ड क्र. २८०७५४१८०६८३ प्रज्ञा प्रदिप मोरे यांचे नावे.

९) भारत निवडणूक आयोग यांचेकडील ओळखपत्र क्र.MT/१०/०५३/१०९८४९१ वंदना मोतीकर यांचे नावे.

१०) अध्यक्ष/सचिव, मित्रधाम सह.गृह.संस्था यांचे नाहरकत पत्र

अर्जदार यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेले पुरावे व सत्यप्रतिज्ञापत्रा नुसार मयत श्रीम. कमला काशिनाथ मोतीकर यांना श्रीम.प्रज्ञा प्रदिप मोरे असे एकमेव वारस असल्याचे दिसून येते.

श्रीम.कमला काशिनाथ मोतीकर यांच्या नोंदणीकृत इच्छापत्राद्वारे त्यांच्या मृत्युपश्च्यात त्यांची बहीण श्रीम. प्रज्ञा प्रदिप मोरे यांना सर्व हक्क प्रदान करण्यात आले आहे.

सबब, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,ठाणे यांचे परिपत्रक क्र.१४, क्रमांक मुंमप्र झोपुप्रा/परिपत्रक/१६/२०२१,दि.२८/०५/२०२१ मधील मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहून विषयांकित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अंतिम परिशिष्ट-२ मधील झो.क्र.२२ वर निवासी कारणास्तव पात्र करण्यात आलेले झोपडीधारक श्रीम. कमला काशिनाथ मोतीकर ह्या दि.०९/०३/२०२१ मयत झाले असुन त्यांचे वारस म्हणून,श्रीम. प्रज्ञा प्रदिप मोरे यांची नांवाची नोंद घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा समन्व्य सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या परिशिष्ट-२ मधील अ.क्र.२२ पुरता मर्यादित राहील. सदरच्या आदेशाचा इतर कोणत्याही शासकीय कामासाठी वापर करता येणार नाही. सदर पुराव्याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा सादर केलेले पुरावे व माहिती खोटी असल्याचे सिध्द झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल व त्याबाबतची सर्व जबाबदारी भारतीय पुरावा कायदा कलम १०१ व १०२ व भारतीय दंड संहिता कोड १८६० चे कलम १७७,१९९,१९२(अ),२००,४२०,४६५,४६८ व ४७१ नुसार कागदपत्रे देणाऱ्या व्यक्तीची राहील व खोटे कथन करणारी व्यक्ती उक्त कायद्यान्वये होणाऱ्या शिक्षेस पात्र असेल.

(मिनल पालांडे)
सक्षम प्राधिकारी
मुंबई महानगर प्रदेश
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,ठाणे -४

प्रत :-

१) कार्यकारी अभियंता,मुंमप्र झोपुप्रा,ठाणे

२) सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,मुंमप्र झोपुप्रा,ठाणे

३) अध्यक्ष/सचिव, मित्रधाम सहकारी गृहनिर्माण संस्था

४) श्रीम. प्रज्ञा प्रदिप मोरे

# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा,
ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (पश्चिम)-४०० ६१०.
दुरध्वनी क्र.०२२-२५८४३९००, ई-मेल-thane@sra.gov.in


क्र.झोपुप्रा/स.प्रा.ठा.४/समन्वय वारस/कावि/२०२४/१३४५ दिनांक :१७/१२/२०२४

वाचले :- १) प्राधिकरणाकडील परिपत्रक क्रमांक१,क्रमांक मुंमप्र,झोपुप्रा/परिपत्रक/१६/२०२१,दि.२८/०५/२०२१

२) सक्षम प्राधिकारी तथा उपायुक्त, समाज विकास विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचे कडील झोपडीधारकांची पात्र/अपात्र बाबतचे परिशिष्ट-२, दि.१२/११/२०१२

३) श्रीम.वलकला हरिश्चंद्र थोरात यांनी प्राधिकरणात सादर केलेला दि. २८/११/२०२४ रोजीचा अर्ज.

## आदेश

मौजे चेंदणी-कोपरी, ठाणे येथील न.भू.क्र.१०२५ अ(पै.) या मिळकती वरील मित्रधाम सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो.) चे परिशिष्ट-२ हे सक्षम प्राधिकारी तथा उपआयुक्त, समाज विकास विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी संदर्भ क्र.२ अन्वये तयार केलेले आहे. सदरच्या परिशिष्ट-२ मध्ये अनुक्रमांक ३७ वर हरिश्चंद्र किसनराव थोरात यांना निवासी कारणास्तव पात्र करण्यात आल्याचे दिसुन येते.

झोपडीधारक हरिश्चंद्र किसनराव थोरात हे दि.२६/०१/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांची पत्नी श्रीम. वलकला हरिश्चंद्र थोरात यांनी श्री. हरिश्चंद्र किसनराव थोरात यांचे नावांऐवजी परिशिष्ट-२ मध्ये वारस नोंद लावण्याबाबत दि.२८/११/२०२४ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे. प्रकरणी दि.०५/१२/२०२४ रोजी सुनावणी ठेवणेत आली सदर सुनावणीचे वेळी श्री.गणेश हरिश्चंद्र थोरात यांनी व्हीडीओ कॉलद्वारे आपली कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले. सबब सुनावणीस श्रीम. वलकला हरिश्चंद्र थोरात, श्री. गणेश हरिश्चंद्र थोरात, श्री.रमेश हरिश्चंद्र थोरात, सौ. मेघा सुधीर चव्हाण हजर होते. अर्जदार यांनी पुढीलप्रमाणे पुरावे सादर केलेले आहेत.

१) महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग यांचेकडील हरिश्चंद्र किसनराव थोरात यांचा दि.२६/०१/२०२४ रोजी मृत्यु झाल्याबाबत नोंदणी क्र.D-२०२४:२७-९०४१२-०००७३,नोंदणी दि.३१/०१/२०२४ अन्वये दि.०१/०२/२०२४ रोजी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र.

२) सक्षम प्राधिकारी तथा उपायुक्त, समाज विकास विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी दि.१२/११/२०१२ रोजी पारित केलेले परिशिष्ट-२ च्या पृष्ठाची छायाप्रत मध्ये अ.क्र.३७ वर श्री. हरिश्चंद्र किसनराव थोरात यांची निवासी पात्र अशी नोंद आहे.

४) महावितरण यांचे विज आकार देयक ग्राहक क्र.०००००३३०४७७४६, दि.२७/०१/२०१० हरिश्चंद्र किसनराव थोरात यांचे नावे.

५) श्रीम. वलकला हरिश्चंद्र थोरात यांचे रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर दि.२५/११/२०२४ रोजी नोटराईज्ड केलेले सत्यप्रतिज्ञापत्र.

६) श्री. गणेश हरिश्चंद्र थोरात, श्री. रमेश हरिश्चंद्र थोरात व श्रीम. मेघा सुधीर चव्हाण यांचे रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर दि.२५/११/२०२४ रोजी नोटराईज्ड केलेले ना हरकत पत्र.

७) अध्यक्ष /सचिव मित्रधाम सहकारी गृहनिर्माण संस्था (रजि.)यांचे श्रीम.वलकला हरिश्चंद्र थोरात यांची वारस म्हणून नोंद करण्याबाबत ना हरकत दाखला.

८) शिधापत्रिका क्र. SA- ३६८३१३ हरिश्चंद्र किसनराव थोरात यांचे नावे.
९)आधारकार्ड क्र. ७४९८ ५८३१ ३३०९ वलकला हरिश्चंद्र थोरात यांचे नावे.
१०)आधारकार्ड क्र.४०४९ ९३३६ ९६६६ गणेश हरिश्चंद्र थोरात यांचे नावे.
११)आधारकार्ड क्र. ४९७५ ७२३१ २५९४ रमेश हरिश्चंद्र थोरात यांचे नावे.
१२)आधारकार्ड क्र. ३५८७ ५२७२ ७३६२ मेघा सुधीर चव्हाण यांचे नावे.

अर्जदार यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेले पुरावे व सत्यप्रतिज्ञापत्र/हमीपत्र यानुसार मयत झोपडीधारक हरिश्चंद्र किसनराव थोरात यांना १)श्रीम. वलकला हरिश्चंद्र थोरात २)श्री. गणेश हरिश्चंद्र थोरात ३)श्री.रमेश हरिश्चंद्र थोरात ४) श्रीम. मेघा सुधीर चव्हाण असे वारस असल्याचे दिसुन येते.

सबब, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे परिपत्रक क्रमांक १४, क्रमांक मुंमप्र,झोपुप्रा/परिपत्रक/१६/२०२१, दि.२८/०५/२०२१ मधील मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहून विषयांकित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मूळ परिशिष्ट-२ मधील अ.क्र.३७ निवासी कारणास्तव पात्र करण्यात आलेले झोपडीधारक श्री. हरिश्चंद्र किसनराव थोरात दि.२६/०१/२०२४ रोजी मयत झाले असुन वारस म्हणुन, श्रीम. वलकला हरिश्चंद्र थोरात (पत्नी) यांचे नांवाची नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदरचा आदेश हा मित्रधाम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मुळ परिशिष्ट-II मधील अ.क्र. ३७ पुरता मर्यादीत राहील. सदरच्या आदेशाचा इतर कोणत्याही शासकीय कामासाठी वापर करता येणार नाही. सदर पुराव्याबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा सादर केलेले पुरावे व माहिती खोटी असल्याचे भविष्यात सिध्द झाल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल व त्याबाबतची सर्व जबाबदारी भारतीय पुरावा कायदा कलम १०१ व १०२ व भारतीय दंड संहिता कोड १८६० चे कलम १७७, १९९, १९२(अ), २००, ४२०, ४६५, ४६८ व ४७१ नुसार कागदपत्रे देणाऱ्या व्यक्तीची राहील व खोटे कथन करणारी व्यक्ती उक्त कायदयान्वये होणाऱ्या शिक्षेस पात्र असेल.

(निर्मल पोलाडे)
**सक्षम प्राधिकारी**
**मुंबई महानगर प्रदेश**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे-४**

प्रत : -

१) कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे.
२) सहा.निबंधक सहकारी संस्था, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे.
३) अध्यक्ष/सचिव मित्रधाम सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.)
४) अर्जदार श्रीम. वलकला हरिश्चंद्र थोरात